## <u>रे.क.न. २६/२०२३ मधील निशाणी क्रमांक ५ खालील आदेश</u>

वादी यांनी प्रस्तुतचा दावा कायम मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** दावा मिळकतीमध्ये वादींचे असलेल्या शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी हरकत व अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त मनाई ताकीद दावेचे अंतिम निकालपावेतो व्हावा यासाठी वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**<u>दावा मिळकतीचे वर्णन</u>** –

**०३.** **अ)** मौजे गोगवे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील ग्रामपंचायत दप्तरी सन २०१९ते २०२३ करीता नोंद असणारी मिळकत क्रं. ५७१ व ५७२ या मिळकती त्याचे एकूण क्षेत्रफळ ३ आर त्याच्या चतुःसिमा खालील प्रमाणे–

पुर्वेस – कळे–म्हासुर्ली रस्ता व त्यापलिकडे प्रतिवादी यांची

मिळकत.

पश्चिमेस – मच्छींद्र महादेव पाटील यांची मिळकत.

दक्षीणेस – मच्छींद्र महादेव पाटील यांची मिळकत.

उत्तरेस – नकुबाई पांडूरंग पाटील यांची मिळकत.

(यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

**<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

**०४.** वर नमुद केलेली दावा मिळकत ही वादी यांची वडीलार्जित कब्जे वहिवाटीची मिळकत असून वादी यांचे पुर्वहक्कदार सत्तू रामू पाटील यांचे नांवे ग्रामपंचायत दप्तरी आजअखेर नोंद आहे. वादी यांचे पूर्वहक्कदार वडील सत्तू रामू पाटील हे दि. ०१.०५.२०१६ रोजी मयत झाले असून त्यानंतर दावा मिळकत वादीचे नांवे नोंद करुन घेणे राहून गेले आहे. परंतु दावा मिळकत ही आजरोजी प्रत्यक्ष वादींचे कब्जेवहिवाटीस होती व आहे. सदर दावा मिळकतीत वादीचे पूर्वहक्कदारापासून वैरण, जळाऊ लाकूड सामान व वेळोवेळी जनावरे बांधणेकरीता त्याचा वापर करत होते व आहेत.

**०५.** प्रतिवादी हे त्यांचे नोकरी निमित्त कायमस्वरुपी सहकुटुंब फुलेवाडी, कोल्हापूर येथे राहणेस आहेत त्यामुळे दावा मिळकतीशी त्यांचा काही संबंध नाही. दावा मिळकतीची पूर्व बाजूस कळे–म्हासुर्ली रस्त्याचे

पूर्वेकडील बाजसू प्रतिवादी यांची शेतमिळकत असून त्यामध्ये प्रतिवादी यांची कब्जेवहिवाट नव्हती व नाही. सदर मिळकतीमध्ये कृष्णात धर्मराज पाटील यांची वहिवाट असून त्यामध्ये त्यांचे घर आहे. त्यामुळे सदर मिळकतीत प्रतिवादी यांची वहिवाट नसलेने प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी काडीमात्र संबंध नाही. दावा मिळकतीत वादींची ४० वर्षापासून वहिवाट आहे.

**०६.** दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा काडीमात्र संबंध नसताना प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करणार असलेचे बोलून दाखवू लागले. त्याबाबत वादी यांनी दावा मिळकतीची कागदपत्रे दाखवली असता प्रतिवादी हे वादीचे काहीही न एकता दावा मिळकतीमध्ये अचनाकपणे दि.१६.०३.२०२३ रोजी येऊन बांधकाम करणेबाबत आखणी करु लागले.

**०७.** वादी कौटुंबिक कामानिमित्त बाहेरगावी गेलेचे पाहून प्रतिवादी यांनी दि. २२.०३.२०२३ रोजी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बेकायदेशीर बांधकाम करणेच्या उद्देशाने पाया खुदाई करुन त्या ठिकाणी बांधकाम करणेचा प्रयत्नात आहेत. त्यावेळी प्रतिवादीने वादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण केला. सदर प्रतिवादी यांनी तसे केलेस वादीचे आतोनात नुकसान होऊन त्यांना त्यांचे कायदेशीर हक्कास

मुकावे लागणार आहे. वादी यांना मनुष्यबळ व आर्थिक पाठबळ नसलेचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीर बांधकाम करणेच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी विरुध्द सदरचा तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल केला आहे तो मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०८. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं. २१ वर दाखल केले आहे. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांचा सदरचा अर्ज व त्यामधील मजकूर हा संपूर्ण चुकीचा व खोटा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादी यांनी वर्णन केलेली दावा मिळकत प्रत्यक्षात कधीही अस्तित्वात नव्हती व नाही. तसेच वादीने दावा मिळकतीच्या चतुःसिमा व क्षेत्र चुकीचे असून ते प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही.

०९. वादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही कायदेशीर हक्क, संबंध अधिकार नाही. वादीची पूर्वहक्कदार सत्तू रामू पाटील असलेबाबत तसेच ते दि. १०.०५.२०१६ रोजी मयत असलेबाबतचे कथन चुकीचे आहे. सत्तू रामू पाटील यांचे नावाची नोंद दावा मिळकतीचे मिळकत पत्रीकेवर नाही. प्रतिवादी हे मुळेचे गोगवे गावचे रहिवासी असून तेथे त्यांची वाडवडिलार्जीत शेत मिळकती आहेत. प्रतिवादी कोल्हापूर येथे नोकरी करीत होते. प्रतिवादी यांच्या

सेवानिवृत्तीनंतर प्रतिवादी यांनी मौजे गोगवे येथील भू–मापन गट नं. १२४/अ या संपूर्ण गट नंबरची रितसर शासकीय मोजणी केली आहे. सदर गटनंबर मध्ये प्रवितादी यांचे मालकीचे हे.०.६३.६० आर क्षेत्र आकार रु. ३.३६ पै. आहे. सदर क्षेत्रापैकी पश्चिम दिशेचे हे. ०.०१ आर क्षेत्रामध्ये प्रतिवादी शेतघराचे बांधकाम करीत आहेत. सदर बांधकाम स्लॅब लेवलपर्यंत पुर्ण झाले आहे. प्रतिवादी बांधकाम करीत असले बांधकामाशी वादी यांचा कोणत्याही प्रकारे हक्क, संबंध व अधिकार नाही. प्रतिवादी यांनी तथाकथित ग्रामपंचायत मिळकत नं. ५७१ व ५७२ मध्ये कधीही कोणतेही बांधकाम केले नव्हते व नाही.

१०. वर नमुद परिस्थिती असताना केवळ प्रतिवादींना त्रास देणेच्या व प्रतिवादींना त्यांचे मालकी व कब्जे वहिवाटीच्या मिळकतीमध्ये बांधकाम करणेस हकरत अडथळा करणेच्या दृष्ट हेतूने वादी यांनी सदरचा खोटा व चुकीचा मनाई अर्ज दाखल केला आहे. वादी यांनी बेकायदेशीरपणे प्रतिवादी यांच्या वर नमुद मालकी व कब्जा वहिवाटीच्या मिळकतीमधील बांधकामास हरकत अडथळा केल्याने प्रतिवादी यांनी वादी विरुध्द रे.क.नं. ३२/२०२३ हा कायम मनाईचा दावा दाखल केला असून तो अद्याप न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे वादींना दावा दाखल करणेस कोणतेही कारण घडलेले नाही.

**११.** वादीनी मागणी केले प्रमाणे प्रतिवादीविरुध्द मनाई ताकीद झालेस प्रतिवादींचे कधीही न भरु येणारे असे अतोनात नुकसान होणार असून प्रतिवादींचे कायदेशीर हक्क डावलले जाणार आहेत. याउलट प्रतिवादी विरुध्द मनाई ताकीद न झालेस वादींचे कोणतेही नुकसान होणेचा संभव नाही. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**१२.** वादीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे ? | नाही. |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल ? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

**१३.** वादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | मौजे गोगावे,ता.पन्हाळा येथील ग्रामपंचायत मिळकत क्रं. ५७१ चा असेसमेंट उतारा. | ०१.०४.२०२३. | स.शि.नक्कल |
| २. | मौजे गोगावे,ता.पन्हाळा येथील ग्रामपंचायत मिळकत क्रं. ५७२ चा असेसमेंट उतारा. | ०१.०४.२०२३. | स.शि.नक्कल |
| ३. | दावा मिळकतीत चालू असलेले बांधकामाचे फोटो (१) | – | फोटो प्रिंट |

**१४.** प्रतिवादींचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. १४ व २३ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | मौजे गोगावे,ता.पन्हाळा येथील गट क्रं.१२४/अ चा ७/१२ उतारा. | १२.०४.२०२३. | स.शि.नक्कल |
| २. | मौजे गोगावे,ता.पन्हाळा येथील प्रतिवादी यांच्या नावचा खाते क्रं.३५ चा ८–अ उतारा. | १२.०४.२०२३. | स.शि.नक्कल |
| ३. | प्रतिवादी यांनी उपअधिक्षक | १५.०७.२०२२ | झेरॉक्स |

| | | | |
|---|---|---|---|
| | भूमि अभिलेख पन्हाळा यांचेकडे दिलेला मागणी अर्ज | | |
| ४. | वर नमुद मोजणीचे पैसे भरलेबाबतचे चलन. | १७.०८.२०२२ | झेरॉक्स |
| ५. | भूमिअभिलेख विभाग यांचेकडून प्रतिवादी यांना दिलेली मोजणीचे 'क' प्रत | २५.०३.२०२३ | झेरॉक्स |
| ६. | प्रतिवादी यांचे नावचे के.डी.सी.सी. बँक शाखाळ वेतवडे येथील पासबुक प्रत. | २५.०३.२०२३ | झेरॉक्स |
| ७. | प्रतिवादी यांनी गट नं. १२४/अ मध्ये केलेल्या बांधकामाचे (४)फोटो | २५.०५.२०२३. | संगणकीय प्रत |
| ८. | प्रतिवादी तर्फे साक्षीदार अशोक दादु पाटील यांचे शपथपत्र | १३.०४.२०२३ | नि.१५ |
| ९. | किर.दिवाणी अपील क्रं. १४०/२०२३ चे कामी पारीत केले आदेशाची प्रत. | ०८.०६.२०२३ | झेरॉक्स |

**१५.** दोन्ही बाजुंच्या दस्तऐवजाचे अवलोकन करता प्रतिवादी यांनी जी साक्षीदाराचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे ते, शपथे विरुध्द शपथ (oath against oath) स्वरुपाची असल्याने व त्या साक्षीदाराचा उलटतपास

झाला नसल्याने त्या प्रतिज्ञापत्रातील कथने आज रोजी ग्राहय धरता येणार नाहीत. तसेच दाव्यात विश्लेषीत केलेली छायाचित्रे ही भारतीय पुरावा कायदया अंतर्गत तरतुदीनुसार पुराव्यादरम्यान सिध्द होतील तत्पुर्वी ती प्रस्तुत अर्जासाठी विचारात घेण्यात येत नाहीत.

## का र ण मि मां सा

### प्रश्नबिंदू क्रं.१ करीता–

**१६.** प्रस्तुत वादी हे तात्पुरता मनाई आदेश मिळण्यासाठी प्रथमदर्शनी केस त्यांच्या हक्कात आहे का हे सिध्द करतात का हे पाहणे महत्वाचे ठरते.

**१७.** प्रस्तुत प्रकरणात वादीने नि.३ च्या वर्णन यादीसोबत मौजे गोगवे, ता. पन्हाळा येथील ग्रामपंचयात मिळकत क्रं.५७१ चा असेसमेंट उतारा तसेच ग्रामपचंयात मिळकत क्रं. ५७२ चा असेसमेंट उतारा अभिलेखावर दाखल केला असून त्यावर सत्तू रामा पाटील यांच्या नावाची नोंद आहे. परंतु सदरचा ग्रामपचंयात मिळकत उतारा हा मालकी हक्काचा नसून कर आकारणी करीता असल्याने ग्रामपंचयात मिळकत क्रं. ५७१ व ५७२ या गावनुमना ८–अ च्या उता–यावरुन वाद मिळकती या वादीच्या ताब्यात आहेत किंवा कसे हे प्रथमतः पाहणे आवश्यक आहे.

१८. याउलट प्रतिवादीनी नि.क्रं. १४ वरील वर्णन यादी सोबत मौजे गोगवे ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील गट क्रं. १२४/अ चा सातबारा उतारा अभिलेखावर दाखल केला असून त्यामध्ये खाते क्रं. ३५ अन्वये ०.६३.६० क्षेत्र प्रतिवादींच्या ताब्यात असल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी उप–अधिक्षक भूमि–अभिलेख पन्हाळा, जि.कोल्हापूर यांच्याकडे दिलेल्या मोजणी अर्जाची छायांकिंत प्रत तसेच मोजणी कामी भरलेले चलन त्याच बरोबर भूमि–अभिलेख यांच्याकडून प्रतिवादी यांना दिलेली मोजणीची 'क' प्रत अभिलेखावर दाखल केली असून प्रतिवादी भागोजी पाटील यांनी गट नं. १२४ ची हद्द कायम मोजणी करणेबाबतचा मु.र.नं.५८८४/२०२३ 'क' प्रतितील नकाशा अभिलेखावर दुय्यम प्रतित दाखल केला असून सदर गटाच्या मोजणीच्या वेळी लगतचे कब्जेदार यांना नोटीसा दिल्या होत्या, तसेच सदर इसम मोजणी समयी हजर झाले होते. मुळात वादीने दाखल केलेला दाव्यातील मिळकत व प्रतिवादी यांची मिळकत ही वादीच्या मिळकतीच्या पूर्वेस कळे–म्हासुर्ली रस्ता व त्यापलिकडे प्रतिवादी यांची मिळकत असल्याचे दिसून येते.

१९. नि.२३ वरील वर्णन यादीसोबत प्रतिवादी यांनी कोल्हापूर येथील मे. जिल्हा न्यायालयसो यांनी दिवाणी किरकोळ अपिल नंबर १४०/२०२३ चे कामी पारीत केलेल्या आदेशाची प्रत अभिलेखावर दाखल

केली आहे.

२०. वादी यांचे पुर्वहक्कदार वडील सत्तू रामा पाटील यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीचे पत्रीकेवर असल्याची बाब वादी यांनी पुराव्यान्याशी न्यायालयासमोर आणलेली नाही. वादींनी कथन केलेल्या कृष्णात धर्मराज पाटील यांच्या कब्जे वहिवाटीतील मिळकतीशी अगर प्रतिवादींच्या मालकी व कब्जेवहिवाटीच्या मिळकतीशी प्रस्तुत प्रकरणातील वादीचा हक्क अधिकार नाही हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने अभिलेखावर दाखल केलेला नाही. वादीने त्यांच्या दावा व नि. ५ च्या अर्जामध्ये कथन केल्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादींची साधारण ४० वर्षापासून वहिवाट आहे हे दर्शविणारा तोंडी अथवा लेखी पुरावा वादीने अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रस्तुत प्रतिवादीने वादीच्या तथाकथित दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केल्याची बाब सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे. परंतु त्या अनुषंगाने वादीने दावा मिळकतीचे मालकी व कब्जा बाबतचे दस्त ऐवज अभिलेखावर दाखल करणे क्रमप्राप्त होते. मिळकत क्रं. ५७१ व ५७२ च्या पूर्वेस कळे–म्हासुर्ली रस्ता व त्यापलिकडे प्रतिवादी यांची मिळकत असे वर्णन वादीने त्यांच्या दावा व नि.५ च्या मिळकतीच्या वर्णनामध्ये केले असून कळे म्हासुर्ली रस्त्या पलिकडे प्रतिवादी यांची मिळकत असून दोघांच्या

मिळकतीमध्ये रस्ता आहे ही बाब लक्षात येते. प्रतिवादी त्यांच्या मिळकतीला लागून असलेला रस्ता सोडून वादींच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्यासाठी येऊ शकतात ही बाब मुख्यतः न पटणारी आहे.

२१. तालुका अधिक्षक भूमि–अभिलेख यांनी नकाशावर रस्ता दाखवला नाही अशी वादींची तक्रार आहे. परंतु सदरची मोजणी प्रतिवादींनी त्याची मिळकत क्रं. १२४/अ च्या अनुषंगाने करुन घेतली असून त्यामध्ये वादी हा लगतचा हिस्सेदार नसल्याचे नकाशावरुन दिसून येते तसेच सदरची मोजणी प्रतिवादीने कोणत्या मिळकती बाबत केली हे वादीने पाहणे अत्यंत आवश्यक आहे. वादी यांचा मिळकत क्रं. ५७१ व ५७२ या मिळकतीमधील एकूण क्षेत्रफळ ३ आर. असल्याचे व त्यावर त्यांना वादीचे पुर्वहक्कदार सत्तू रामा पाटील यांच्याकडून कब्जा मिळाल्याचे सिध्द करु शकले नाहीत. सबब, प्रश्नबिंदू क्रं. १ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते.

**<u>प्रश्नबिंदू २ व ३ करीता</u> –**

२२. प्रस्तुत दाव्यात प्रश्नबिंदू क्रं. १ चे उत्तर वादीचे विरोधात असल्याने न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजूने नाही. दावा मिळकत संदर्भात दस्तांवरुन प्रथमदर्शनी कब्जेवहिवाट ही वादीची आहे असे दिसत नाही. सबब तुर्त मनाई हुकुम वादींना दिल्यास प्रतिवादीचे अपरिमित नुकसान

होण्याची शक्यता हिच जास्त असते. सबब, प्रश्नबिंदू क्रं. २ व ३ नकारार्थी नोंदवण्यात येत आहे.

**प्रश्नबिंदू ४ करीता –**

**२३.** प्रश्नबिंदू क्रं. १ ते ३ चे उत्तर हे वादीच्या हक्कात नसल्याने प्रश्नबिंदू क्र. ४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. उक्त अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालानंतर होणा–या खर्चाच्या आकारणीवेळी विचारात घेण्यात यावा.

Digitally signed by V. A. Lavand-Kokate
Date: 2023.07.11 17:53:46 +0530

V. A. Lavand-Kokate

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दि. १०.०७.२०२३.

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कळे–खेरीवडे.